# ''ग्रामीण महिला समस्या व उपाययोजना''

**प्रा. डॉ. सलामपुरे फुलचंद**
**समाजशास्त्र विभाग प्रमुख,**
**संत ज्ञानेश्वर महाविद्यालय,**
**ता. सोयगाव, जि. औरंगाबाद.**

सारांश :

आज स्त्री ने सर्वच क्षेत्रात स्वत:चे अस्तित्त्व निर्माण केले आहे. पुरुष मक्तेदारी असलेले क्षेत्रात देखील कामगिरी बजावली आहे. पण पुरुषसत्ताक समाजात आज ही तिचे स्थान दुय्यम आहे.

शहरी भागापेक्षा ग्रामीण भागातील महिलांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. शिक्षण, आरोग्य, आर्थिक मोबदला, लैंगिक अत्याचार, हुंडा बळी, कौटुंबिक हिसांचार अशा अनेक प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागते.

प्रस्तुत संशोधनाचा उद्देश ग्रामीण भागातील महिलांच्या कौटुंबिक, आरोग्य, आर्थिक समानता, लैंगिक अत्याचार, हुंडाबळी, कौटुंबिक हिंसाचार अशा समस्यांचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

उद्दिष्टे :

- ग्रामीण महिलांच्या कौटुंबिक समसयाचा अभ्यास करणे. ग्रामीण महिलांच्या शौक्षणिक समस्याचा अभ्यास.
- ग्रामीण महिलांच्या आरोग्य समस्यांचा अभ्यास करणे.
- ग्रामीण महिलांच्या आर्थिक विषमताचा अभ्यास करणे.
- ग्रामीण महिलांच्या लैंगिक अत्याचाराचा अभ्यास करणे.
- ग्रामीण महिलांच्या हुंडा बळीच्या समस्याचा अभ्यास करणे.

प्रस्तावना :

ग्रामीण भागाचा अभ्यास करतांना कुटुंबाचा प्रमुख पुरुष असतो. कुटुंबातील महत्त्वपूर्ण निर्णय पुरुष घेत असतो. कुटुंबातील स्त्रीचे स्थान नगण्य असते. स्त्रीला दुर्लक्षित घटक म्हणून बघितले जाते, म्हणून विविध स्वरूपाच्या समस्यांना महिलांना तोंड द्यावे लागते.

ग्रामीण महिलांचा समस्या :

स्त्री ही आई, बहीण, पत्नीची भूमिका पार पाडत कौटुंबिक जबाबदारी समर्थपणे पेलत असते. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रिया पुरुषांवर अवलंबून असल्याने त्यांना स्वत:चा निर्णय घेण्याचा फारसा अधिकार नसतो. त्यामुळे आजही स्त्रीचे स्थान नगण्याच असल्याने त्यांच्यावर अन्याय, अत्याचार होताना दिसतो. पितृसत्ताक व्यवस्थेमध्ये कुटुंबात मुलांचा जन्म उत्साहात साजरा केला जातो तितका उत्साह मुलगी जन्म झाल्यावर केला जात नाही. मुलगी म्हटल की अनेक समस्या निर्माण करणारी समजून तिची भ्रुणहत्या केली जाते. १९०१ साली दर हजार पुरुषामागे ९७२ स्त्रिया होत्या ते प्रमाण १९११ साली ९२७ पर्यंत घसरले होते. २०११ साली स्त्रियांचे प्रमाण प्रत्येक हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण ९४० इतके पोहोचले होते. आज स्त्री पुरुष जन्मदरात मोठी तफावत दिसून येते. स्त्रीचे घटते जन्मदर चिंतेची बाब बनत चालले आहे.

कुटुंबातील महत्त्वपूर्ण निर्णय पुरुष घेत असल्याने स्त्रीमध्ये निर्णयक्षमता कमी दिसून येते. कुटुंबाचे महत्त्वपूर्ण निर्णय पुरुषच घेतात तो पुरुष दारूडा व्यसनी असला तर कुटुंबाची राखरांगोळी होते. कुटुंबामध्ये स्त्रीवर शाररीक,

मानसिक हिंसाचार होतात त्याची तक्रार करण्याचा अधिकार देखील नसतो निमपणे सहन करून अनेक शाररीक मानसिक समस्यांना तोंड स्त्रीयांना द्यावे लागते.

ग्रामीण महिलांच्या आरोग्यांच्या समस्या :

ग्रामीण भागातील महिलांना अनेक शाररीक व्याधींना सामना करावा लागतो. ग्रामीण भागात दर दोन महिलामागे एक महिला कसल्या ना कसल्या अशक्तपणाच्या तक्रारीने ग्रस्त असते. ३५ऽ टक्के महिला गंभीर स्वरूपाच्या अशक्त आहेत. तर १५ ऽ टक्के महिला कमी गंभीर स्वरूपाच्या अशक्तेचा त्रास आहे. असे अनेक डॉक्टरांनी व्यक्त केले. महिलांच्या आरोग्याला हे शेवटच्या प्राधान्य क्रम देतात. कौटुंबिक जबाबदारी पार पाडत असतांना स्वत:च्या आरोग्याकडे दुर्लक्ष करून कुटुंबाच्या आरोग्याकडे लक्ष देतात ज्यावेळी आजार गंभीर होतो त्यावेळी दवाखान्यात नेले जाते. पण ग्रामीण भागात आरोग्यांच्या सोयी कमी असल्यामुळे तज्ञ डॉक्टर संख्या कमी असल्यामुळे महिलांचे आजार गंभीर होऊन मृत्यूचे प्रमाण जास्त, कॅन्सरच्या बाबतीत प्रथम अवस्थेत दुर्लक्षित केल्यामुळे दुसज्या अवस्थेत गंभीर रूप घेतल्याने निदान करण्यात वेळ जातो. आज ग्रामीन भागात मोठया प्रमाणात गर्भशयाचे कॅन्सर प्रमाण जास्त दिसून येते. ग्रामीण भागातील महिलांना अशिक्षित अस्वच्छता, स्वत:कडे दुर्लक्ष यामुळे अनेक आजारांना बळी पडावे लागते.

ग्रामीण महिलांच्या शौक्षणिक समस्या :

महाराष्ट्रामध्ये ७५ महिला प्राथमिक शिक्षण पुर्ण करतात पण ग्रामीण भागात सुविधाचा अभाव असल्यामुळे पुढील शिक्षणाच्या अडचणी निर्माण होतात. घरामधील पुरुषांचे वर्चस्व असल्यामुळे मुलांच्या शिक्षणाकडे जास्त लक्ष दिले जाते. उच्च शिक्षणासाठी मुलीपेक्षा जास्त खर्च मुलांवर केला जातो. ग्रामीण भागातील मुली १० ते १२ पर्यंत शिक्षणपुर्ण कसेबसे करतात. वाहणाचा अभावा, अपुज्या सुविधा, अशिक्षित आई-वडील, समाजाचा मुलीकडे बघण्याचा दृष्टीकोन यामुळे ग्रामीण महिला व मुली यांना अर्धवट शिक्षण सोडावे लागते.

ग्रामीण महिलांच्या आर्थिक समस्या :

ग्रामीण भागात पुरुषापेक्षा स्त्रीया जास्त काम करतात पण वेतनामध्ये तफावत दिसते. पुरुषापेक्षा स्त्रीयांना रोजगार कमी मिळतो. ऊसतोड कामगाराचा अभ्यास केला तर महिलांना पुरुषांच्या तुलनेत अति अल्प वेतन मिळते. त्या पौशावर देखील पुरुषांचा अधिकार असतो. घरकाम करून शेती शेतीपूरक व्यवसाय मिळालेला मोबदला स्वत:वर खर्च करू शकत नाही. वडिलांच्या मालमत्तेत मुलीचा अधिकार, पोटगीचा अधिकार, पतीच्या मालमत्तेत समान वाटा असून देखील ग्रामीण महिलांना याचा लाभ घेता येत नाही. स्वंयसहाय्यता बचत गटामार्फत मिळालेल्या कर्जाचा देखील घरावर खर्च करावा लागतो.

ग्रामीण महिलांच्या हुंडाबळीच्या समस्या :

हुंडा मिळो वा ना मिळो मुलीला ठार करण्याची संख्या सतत वाढत आहे. हुंडा कमी मिळाला म्हणून शारीरिक आणि मानसिक छळ करुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले जाते. नाही तर जाळून, विहिरीत ढकलून, विष पाजून मारुन तरी टाकले जाते. हुंडयाच्या नावाखाली मरणाज्या स्त्रियांची संख्या सतत वाढत असल्यामुळे ही स्त्रीच्या दृष्टीने भयानक समस्या निर्माण झाली आहे.

- कलम ३०६ नुसार पतीने किंवा नातेवाईकांनी छळ करणे गुन्हा ठरतो.
- महिला संघटनांची स्थापना करुन स्त्री शक्ती द्वारे पीडीत महिलांना मदत करता येते.
- हुंडा प्रतिबंध करण्यासाठी हुंडा घेणाज्याला ५ वर्ष केंद्र १५००० रु. दंडाची शिक्षा होऊ शकते.
- आर्थिक स्वावलंबनासाठी मुलींना उच्च शिक्षण देणे पायावर उभे करणे, स्वयंसहाय्यता बचत गट स्थापून लघुउद्योग करणे त्याद्वारे आर्थिक स्वावलंबित होणे यामुळे महिलांची आर्थिक समस्या सुटू शकते.
- कलम १९ नुसार पुरुषाप्रमाणे स्त्रियांनाही व्यवसाय स्वातंत्र्य दिले आहे.
- स्वाधार :- २००१-०२ ला स्वाधार योजना सुरु करुन गरीब, गरजु, विधवा महिलांना राहण्याची सोय, आरोग्य सुविधा, शिक्षण, सामाजिक, आर्थिक पुनर्वसन कौशल्य प्रशिक्षण १९९४ मध्ये समान मालमत्तेमध्ये अधिकार.

## निष्कर्ष :

महिलांना समानता, घरामध्ये योग्य वागणुक, शौक्षणिक, आरोग्य यांच्या सुविधांचा लाभ देणे. आर्थिक स्वावलंबन मिळवून विल्पास अनेक समस्या सुटू शकतात.

## संदर्भसूची :

१. महिला विकास योजना व कार्यक्रम, ऑक्टोबर ०३, २०१५.

२. ग्रामीण नागरी प्रश्न आणि समस्या, डॉ. दा.धो. काचोळे, के.एस. अतकरे, कैलाश पब्लिकेशन, गोकुळवाडी, औरंगपुरा, औरंगाबाद.